# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र,
कफ परेड, कुलाबा, मुंबई-४०० ००५
**दूरध्वनी: ०२२-२२१६ ३९६४/६५/६९ फॅक्स: ०२२-२२१६ ३९७६.**
**ई-मेल: mercindia@mercindia.org.in वेब-साईट** www.mercindia.org.in

## प्रेस नोट

**क्रॉस सबसिडी अधिभाराबाबतच्या महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या (आयोग) निर्णयाचा फेरविचार करावा अशी विनंती करणाऱ्या याचिकेवर आयोगाचा ९ सप्टेंबर, २०११ निर्गमित झालेला आदेश आणि मुक्त प्रवेश ग्राहक यांनी देय असलेल्या क्रॉस सबसिडी अधिभाराची नव्याने फेरनिश्चिती करण्याबाबत**

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने (आयोग) क्रॉस सबसिडी अधिभाराबाबत २००६ साली दिलेल्या आदेशानुसार (प्रकरण क्र. ९/२००६, दि.५सप्टेंबर २००६) शून्य क्रॉस सबसिडी अधिभार आजपर्यंत (९सप्टेंबर २०११ रोजी निर्गमित केलेला आदेश) लागू होता. दि. ५ सप्टेंबर २००६ च्या आदेशाचा आयोगाने फेरविचार करावा अशी याचिका महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. (महावितरण) यांनी २५ ऑगस्ट २०१० रोजी केली होती. ही याचिका दाखल करण्यात आलेला विलंब माफ करण्यात यावा अशी विनंती केली होती. महावितरणने आयोगासमोर असे निवेदन केले होते की क्रॉस सबसिडी अधिभार शून्य ठरविला जाऊ शकत नाही. खरे तर, कोणत्याही ग्राहकाने मुक्त प्रवेश घेतल्यानंतर क्रॉस सबसिडीमुळे महावितरणची होणारी हानि भरुन काढण्याएवढा हा अधिभार असावा असे महावितरणचे म्हणणे होते.

आयोगाने ९ सप्टेंबर २०११ च्या आपल्या आदेशानुसार महावितरणची याचिका फेटाळली आहे, कारण या याचिकेत कोणतीही गुणवत्ता नसून आयोगाच्या आदेशानंतर (५ सप्टेंबर २००६) ४५ दिवसांत ही याचिका दाखल करण्यात आली नसल्याने ती कालबाह्य झाल्याचे या आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

वीज उपलब्धतेची २००६ या वर्षातील परिस्थिती आता पूर्णपणे बदललेली असल्याने आयोगाने क्रॉस सबसिडी अधिभाराची निश्चिती नव्याने करण्याचे ठरविले आहे. अखंडीत आणि खंडीत प्रक्रिया उद्योगांच्या बाबतीत २००६ साली भारनियमन अनुक्रमे १० ते २० टक्के असल्याची नोंद आयोगाने घेतली आहे. त्या परिस्थितीत क्रॉस सबसिडी अधिभार शून्य असावा ज्यायोगे उद्योगांना मुक्त प्रवेशाद्वारे आपली विजेची गरज पूर्ण करणे शक्य झाले आणि क्रॉस सबसिडी अधिभार लावला असता तर राज्याच्या अर्थव्यवस्थेच्या विकासावर त्याचा विपरीत परिणाम झाला असता. सद्य स्थितीत महावितरणने आयोगाला असे कळविले आहे की राज्यातील बहुतेक सर्व भागातील भार नियमन रद्द करण्यात आले असून अगदी थोड्या ठिकाणी वहन विषयक समस्यांमुळे ते चालू आहे. त्याचप्रमाणे, क्रॉस सबसिडी अधिभाराच्या सूत्रातील वीज दर आणि टाळता येणाऱ्या वीज खरेदीवरील भारांकित सरासरी खर्चाच्या दरात देखील बदल झाला आहे.

आयोगाने व्यापक चर्चा आणि उचित नियामक प्रक्रियेचे पालन करुन, केंद्रीय ऊर्जा मंत्रालयाच्या वीज दर विषयक धोरणात विनिर्दिष्ट करण्यात आलेले क्रॉस सबसिडी अधिभाराचे सूत्र स्वीकारले असून ते विद्युत अधिनियम, २००३ मधील उद्दिष्टांना अनुसरुन आहे. आंध्र प्रदेश विद्युत नियामक आयोगाच्या एका

अपीलावर निर्णय देताना मा. विद्युत अपीलीय न्यायाधिकरणाने असे नमूद केले होते की सर्व नियामक आयोगांनी वीज दर धोरणातील क्रॉस सबसिडी अधिभाराच्या सूत्राचा अवलंब करावा. आयोगाने ९ सप्टेंबर २०११ च्या आदेशान्वये राष्ट्रीय वीज दर धोरणातील सूत्राचा अवलंब केलेला आहे.

संबंधित परवानाधारकांच्या २०१०-११ च्या वीज दर निश्चितीच्या आदेशात मान्यता दिलेला सरासरी आकारणी दर, वीज खरेदी खर्च, वहन आकार आणि यंत्रणेतील हानि यांचा विचार करुन क्रॉस सबसिडी अधिभार ठरविण्यात आला आहे. या आदेशानुसार मुक्त प्रवेश ग्राहकांना त्यांच्या वर्गवारीनिहाय आणि व्होल्टेजच्या पातळीनुसार क्रॉस सबसिडी अधिभार लागू करण्यात आला आहे. देय अधिभाराचे प्रमाण पुढीलप्रमाणे असेल.

**महावितरण** : उच्च-दाब वर्गवारी - प्रति युनिट रु. ०.२१ ते ३.९७

**रिलायन्स इन्फ्रा - वितरण** : उच्च-दाब वर्गवारी - प्रति युनिट रु. ०.२६ ते २.७९

**टाटा वीज कंपनी - वितरण** : उच्च-दाब वर्गवारी (केवळ तात्पुरत्या ग्राहक वर्गवारीसाठी) - प्रति युनिट रु. २.५८ ते २.८१

महावितरणच्या क्षेत्रात उच्च-दाब औद्योगिक ग्राहकाकडून मुक्त प्रवेशाची मागणी होण्याची अधिक शक्यता आहे. त्यांच्यासाठी देय क्रॉस सबसिडी अधिभार प्रति युनिट २१ पैसे ते ९२ पैसे राहील. देय क्रॉस सबसिडी अधिभार विचारात घेतल्यानंतरही या ग्राहकांना मुक्त प्रवेश किफायतशीर राहील. त्याचप्रमाणे विद्युत अधिनियम, २००३ मधील मुक्त प्रवेश आणि बाजार विकास या उद्दिष्टांशी तो सुसंगत असेल. रिलायन्स इन्फ्रा - वितरण आणि टाटा वीज कंपनी - वितरण यांच्या ग्राहकांनाही हीच बाब ९ सप्टेंबर, २०११ पासून लागू होईल.

नूतनशील ऊर्जा स्रोतापासूनची वीज घेणाऱ्या मुक्त प्रवेश ग्राहकांना त्यांच्या वर्गवारीकरिता लागू असलेल्या क्रॉस सबसिडी अधिभाराच्या २५ टक्के इतका अधिभार देय असेल. विद्युत अधिनियम, २००३ च्या उद्दिष्टांप्रमाणे नूतनशील ऊर्जा निर्मितील प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने क्रॉस सबसिडी अधिभाराला ही सवलत देण्यात आली आहे.

क्रॉस सबसिडी अधिभार देय झाल्यानंतरही मुक्त प्रवेश ग्राहकाला याबाबतचे व्यवहार करणे शक्य होईल याचेही विश्लेषण आयोगाने केले. मुक्त प्रवेश ग्राहकाला प्रति युनिट रु. ३.५० दराने वीज उपलब्ध झाली तर आणि देय वहन आकाराचा त्यात समावेश असेल असे गृहित धरुन हे विश्लेषण करण्यात आले आहे. उदा. एक्सप्रेस/नॉन एक्सप्रेस फिडर्सला जोडलेला औद्योगिक/वाणिज्यिक उच्च-दाब ग्राहकांना मुक्त प्रवेश घेतल्यास प्रति युनिट सुमारे रु.१.४७ पर्यंत लाभ होऊ शकेल.

हा सविस्तर आदेश आयोगाच्या www.mercindia.org.in या संकेत-स्थळावर उतरवून घेण्याच्या स्वरुपात उपलब्ध आहे.

(कुलदीप खवारे)
सचिव, मविनिआ

९ सप्टेंबर २०११